Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 114 – 122

DOI: 10.5281/zenodo.8349744

Original Research Article

# हैदराबाद मुक्तीसंग्रामात किनवट माहूर तालुक्यातील बंजारा व आदिवासी समाजाचे योगदान

प्रा. डॉ. दत्ता उद्धव जाधव

संशोधन मार्गदर्शक व विभाग प्रमुख, इतिहास विभाग, श्रीरेणुकादेवी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, माहूर ता. माहूर जि. नांदेड. ४३१७२१ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: Jadhavdu24@gmail.com

Received: 15 September, 2023 | Accepted: 16 September, 2023 | Published: 17 September, 2023

**महत्वाचे शब्द:** हैदराबाद मुक्तीसंग्राम, किनवट, माहूर, बंजारा समाज, आदिवासी समाज, हैदराबाद संस्थान, निझाम, रझाकार

## प्रस्तावना

हैदराबाद हे दक्षिणेतील एक स्वातंत्र्य राज्य होते. या राज्याला निजामशाही, असफजाही, हैदराबाद स्टेट असे नावाने. ओळखले जायचे. निजाम शाहीची स्थापना चीन कुली खान उल्मुल्क कमरुद्दीन सिद्दीकी याने केली होती. तो मोगलांचा दख्खनचा सुभेदार होता त्याने सन १७२४ ला हैदराबाद स्वातंत्र्य राज्य घोषित केले. निजामाच्या सात पिढ्या. हैदराबादवर राज्य केले. १. मीर कमरुद्दीन सिद्दकी २. मीर निझाम अली खान ३. मीर अकबर अली खान ४. मीर नासिरुद्दीन उद्दौला फरकंद अली खान ५. मीर तेहनियत अली खान ६. मीर महबूब अली खान आणि ७. निजाम मीर उस्मान अली खान निजामशाही रियासत लोकसंख्या आणि क्षेत्रफळाच्या बाबतीत त्याकाळात ५६२ रियासत मधील सर्वात मोठी होती. यात चार. महसुली विभाग होते. १. मराठवाडा यात औरंगाबाद, बीड, परभणी, नांदेड. २. गुलबर्गा यात बिदर. गुलबर्गा, उस्मानाबाद रायचूर. ३. मेदक यात बलदाह, मेहबूबनगर, मेदक, नलगोंडा, निजामबाद. ४. वरंगल,करीमनगर आदिलाबाद. वारंगल. हे जिल्हे होते. निजाम शाही २२४ वर्षे टिकून होती. निजाम म्हणजे व्यवस्था, शाही म्हणजे राज्य. ब्रिटिश भारत १५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य दिन साजरा करीत होता. निजामाने आपले हैदराबाद

राज्य स्वतंत्र भारतात सामील करण्यासाठी नकार दिला. निजाम आणि रझाकारांनी हैदराबाद राज्य स्वतंत्र राहण्यासाठी प्रयत्न करीत होते. भारत सरकारने हैदराबाद राज्य स्वतंत्र भारतात विलीन करण्यासाठी जयंतनाथ चौधरी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय सैन्याची एक टुकडी सोलापूर मार्गे हैदराबाद राज्यात प्रवेश केला. या भारत सरकारच्या लष्करी कारवाईला ऑपरेशन पोलो असे नाव देण्यात आले. स्वतंत्र भारताचे पहिले ग्रुहमंत्री वल्लभभाई पटेलांच्या समोर निजाम उस्मान अली खानने शरणागती पत्करली होती. आणि हैदराबाद राज्य १७ सप्टेंबर १९४७ ला स्वतंत्र भारतात सामील झाले होते.

बंजारा समुदाय हैदराबाद संस्थानातील तेलंगणा, आंधप्रदेश, ककर्नाटक, मोठ्या प्रमाणात राहतात. बंजारा समाज हिंदू संस्कृतीचा पालनकर्ता आहे. बंजारा समाजात आंध्र प्रदेशातील बालाजीला कुलदैवत मानतात. बंजारा समाजाची अशी धारणा आहे की, हाथीराम बाबा या बंजारा व्यक्तीने तिरुपतीला बालाजी दैवतांची स्थापन केली. विशाखापट्टणमची जगदंबा देवी यांचे पुजारी संत सेवालाल महाराजांचे वडील भिमाजी रामजी नाईक होते. मराठवाड्यातील किनवट आणि माहूर परीसरातील बंजारा समाजाचे नाईकांचे हैदराबाद स्वतंत्र संग्रामात महत्त्वाचे योगदान होते. हैदराबाद राज्यातील बंजारा नाईकांचे दोन गट पडले होते. एक गट निझामाला सहकार करणारा होता. दुसरा गट निझामाच्या विरोधात आंदोलनात सहभागी झाला होता. हैदराबाद स्वतंत्र संग्रामाच्या चळवळीत किनवट माहूर परीसरातील रझाकारांच्या विरोधात आंदोलन झाले होते. या परीसरातील पठाण आणि रोहिल्ले रझाकारांच्या संघटनेच्या माध्यमातून या भागातील बंजारा नाईकांना त्रास देत होते. बंजारा समाजातील लोकांनी यांना प्रतिकार करू लागले होते. निजाम सरकाराचे रझाकारांच्या संघटनेला पाठींबा असल्याने ते जमिनदार नाईकांना ही त्रास देत होते. यामुळे निजामाच्या सहकारी गटही विरोधात गेला. रजाकार एक मुस्लिम संघटना होती. बंजारा समाज हा हिंदू धर्माचा पालन करणारा आहे. ज्यामुळे निजामाला सहकार्य करणारे बंजारा समाजातील श्रीमंत नाईकांनी निजामाचा विरोध केला. हैदराबाद स्वतंत्र संग्रामात ग्रामीण भागातील बंजारा समाजचे अनेक लोक सहभागी झाले होते. पण त्यांच्या कार्याची दखल इतिहासात घेतली गेली नाही. किनवट माहूर तालुक्यातील अनेक तांड्यात बंजारा समाजाचे नाईकांच्या वाडी, हवेली, गढी. यांची साक्ष देतात. की, निजाम काळात बंजारा नाईकांकडे निजामाच्या जागीरदारी, वतनदारी, इजारदारी होती. किनवट माहूर तालुक्यातील अनेक नाईकांचे कार्याची स्तुती गिते आजही त्यांच्या लोक गीतातून गायली जातात. तसेच समकालीन लोकांकडून या तत्कालीन आंदोलनाचे, क्रातीकारांची माहिती मिळते. किनवट माहूर तालुक्यातील बंजारा समाजाचे नाईकात प्रामुख्याने मांडवीचे बळीराम पाटील, रायपूर तांड्यातील होनाजी राठोड नाईक, आणि गोबाजी राठोड नाईक, दहेलीचे धावजी जाधव नाईक, पलाईगुडाचे गेम सिंग पवार नाईक, भिलवाडीची पणी नायकीण आणि रायपूर तांड्यातील झिपी कारभारीन, कणकीचे फकिरा जाधव नाईक यांनी हैदराबाद स्वातंत्र्यसंग्रामात आपआपल्या परीने भाग घेतला होता. निझामाच्या दरबारात या परिसरातील नाईकांची चांगली प्रतिष्ठा होती. निजामाकडे येथील जहागिरी, वतनदारी, इजारदारी यांच्या महसुली उत्पन्न लेवी नावाने प्रसिद्ध असलेल्या कर नाईकाकडून जमा करुन पाठवले जात होते. निजामाच्या तिजोरीत मोठ्या प्रमाणात जमा होत असे. निजाम मीर मेहबूब पाशा काळात १८८३ पासून हैदराबाद संस्थानांत ब्रिटिश सरकार प्रमाणेच राज्यकारभारात सुधारणा करण्यात आले होते. यात महसूल, कस्टम, न्यायालय, पोलिस टपाल, रेल्वे, शिक्षण, आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, पाटबंधारे, याप्रमाणे. २१ विभाग निजामाने तयार केले होते. याप्रमाणे गावपातळीपर्यंत प्रशासन व्यवस्था राबवली जात होती. निझामाच्या काळात सोळा आण्याचा एक रुपया होता. गावचा कारभार पाटील आणि. पटवारी यांच्या हातात होता. गावचा पाटील गावात न्यायदान करीत होता. रस्ते, रेल्वे यांची सुधारणा झाली होती. यामुळे माणसाचा संपर्क वाढला होता. निजाम राजवटीत क्रुषी क्षेत्रासाठी तगाई नावाने योजना राबविण्यात आली होती. या तगाई योजनेत शेतकर्यांना शेतीपूरक अवजारे कमी व्याजदरात कर्ज दिले जात होते. माहूर किनवट तालुक्यातील आदिवासी आणि बंजारा समाजाचे

शेतकर्यांना शेती करण्यासाठी बियाणे खरेदीसाठी निजाम सरकार कडून कर्ज दिले जात होते. तसेच शेती कसण्यासाठी निजाम सरकार कडून बैलजोडी पुरवली जात असे. किनवट तालुका आदिलाबाद जिल्ह्यात येत असल्यामुळे या आदिलाबाद जिल्हाचे जिल्हाधिकारी यांच्या कडून ही योजना राबविण्यात येत होती. शेतकर्यांना बैलजोडीची उपलब्धता करून देण्यात येत होते. सेतुमाधवराव पगडी हे सनदी अधिकारी म्हणून आदिलाबाद जिल्ह्याचे कारभार पाहत होते. किनवट माहूर तालुक्यातील शेतकर्यांना बैलजोडी वाटप करण्यासाठी हजारोच्या संख्येने बैलजोड्या पाहिजे होत्या. पण ती एवढ्या बैलजोड्या आणायचा कुठून? हा प्रश्न होता. तेव्हा सेतुमाधवराव पगडी यांच्या लक्षात आले की, बैलजोड्याची जास्त संख्या केवळ बंजारा समाजाकडे उपलब्ध होते. म्हणून बंजारा समाजातील एखाद्या प्रमुख नाईकाला हाताशी धरून बैलजोड्या उपलब्ध करता येईल. त्याने किनवट माहूर तालुक्यातील प्रमुख बंजारा नाईकाचा शोध घेत असताना त्यांच्या लक्षात आले की, या परिसरात मांडवीचे बळीराम पाटील हा बंजारा समुदायाचा प्रमुख नाईक होते. त्यांना बैलजोडी उपलब्ध करून देण्यासाठी सांगितले गेले होते. आदिलाबादचा सनदी अधिकारी सेतू माधवराव पगडी सोबत बळीराम पाटीलांची ओळख झाली. शेतकर्याना बैलजोडी पुरविण्याची व्यवस्था करण्याचे काम बळीराम पाटीलाकडे सोपवले गेले होते. माहूर किनवट तालुक्यातील अनेक नाईका कडून खरेदी करून बैलजोड्या उपलब्ध करून दिल्या होत्या. बळीराम पाटील आणि सेतुमाधव पगडी यांच्यात चांगली मैत्री झाली होती. सेतुमाधवराव पगडी फावल्या वेळात इतिहासलेखनाचे काम करीत असे. त्यासाठी त्याने जून्या दस्तऐवजाचे उपयोग करीत होते. त्यासाठी त्याने बळीराम पाटलाची मदत घेत असे. बळीराम पाटलांनी सेतू माधवराव पगडीच्या मार्गदर्शनाखाली बंजारा समाजाचा इतिहास लिहिले होते.

**पणी नायकन**

माहूर व किनवट परीसरात पापलवाडी, हिवळनी, भीलवाडीची पणी नायकनचा दबदबा होता. हातात बंदूक घेऊन जंगलात शिकारीसाठी जाणारी बहादूर महीला होती. लावणाचा घेरदार घागरा, नक्षीकाम केलेली कांचळी (चोळी), वायलर कपडाची ओढणी, अंगावर सोन्याचे विविध अलंकार, हातात सोन्याची पाटल्या (कंगना), पायात चांदीचे कडे, नाकात सोन्याचे कमानी भुरीया (नथ), असा भारदस्त व्यक्तिमत्त्वाची पणी नायकन होती. गावात न्यायनिवाडा करण्यासाठी नसाबात बसत होती, तेव्हा तिच्या आजूबाजूला बंदूकधारी अंगरक्षक असायचे. तिच्या जवळ नेहमी बंदूक असायची. तिच्या हवेली समोर नेहमीच लोकांची वर्दळ असायचे. पणी नायकन ही हिवळनी, पापळवाडी, भीलवाडीचे मालगुजार छाजूसिंग नाईक यांची पत्नी होती. पणी नायकनाचा जन्म किनवट तालुक्यातील जरूरतांडा येथील चव्हाण घराण्यात सुमारे १८९० झाला होता. चव्हाण घराणे मूळचे कासारपेठचे होते. पन्नो लहानपणापासून धाडसी होती. गाव जंगला जवळ असल्याने नेहमी जंगलात शिकारीला जाणे तिचा छंद होता. भीलवाडीचे काळू नाईक यांचा मुलगा छाजूसिंग नाईक सोबत तिचा विवाह झाला होता. छाजूसिंग नाईक आणि पणी नायकन या दांपत्याला एक मुलगा अंबरसिंग आणि तीन मुली होत्या. अंबरसिंग राठोड नाईकांनी हैदराबाद येथील सैनिक शाळेतून शिक्षण घेतले होते. त्यांना बंदूक चालवता येत होती. माहूरचे जागीरदार भाऊसाहेब देशमुख पणी नायकनला धर्माची बहीण मानत होता. निजामशाहीत माहूरच्या जहागिरदार भाऊसाहेब देशमुखांना विशेष मान होता. भाऊसाहेब देशमुखांची जहागिरीची सीमा पणी नायकनच्या जहागिरीला लागुन होती. पणी नायकन भाऊसाहेबांना नेहमी भेटत असत. त्याच्या सल्ल्यानुसार. न्यायनिवाडाही करत असे. माहूर परगणातील बंजारा समाजातील वाद- तंटा मिटवण्यासाठी. जेव्हा भाऊसाहेबकडे जात असे, तेव्हा तो पणी नायकनला बोलावून तिच्या कडून न्याय निवाडा करून घेत असे. पणी नायकन निजामाच्या दरबारात जात असे. एखादा भयानक दुष्काळ पडला होता. जनता अन्नासाठी दारोदार भटकू लागली होती.

पणी नायकनला काळजी वाटू लागली. नायकनकडे जनता धान्याची मागणी करू लागली. लोक अन्नविना मरत होते. दुष्काळात अन्नधान्य पुरवण्यासाठी पणी नायकन हैद्राबादला निजामाला भेटण्यासाठी गेली होती. निझामाने आपल्या दरबारात मिस्किलपणे पणी नायकनला उद्देशून म्हणाले की, "घागरा संभालके बैठीये नायकन, नही, तो खरघोष भाग जायेगा! तेव्हाच नायकनने करारा. उत्तर दिले कि, निजाम सरकार मै शेरणी हु, और शेरणी के सामने खरघोष भागा नही करते्". पणी नायकन निजामाच्या दरबारातून निराश होऊन आली. तो काही करू शकत नव्हता. माहूर किनवट परीसरातील जागीरदार, श्रीमंत लोकांकडून. अन्न वाटप करण्याची विनंती केली. काही श्रीमंत सावकाराने मदत केली. तरी पण अन्नाचा तुटवडा पडत होता. चिंचखेडा येथील जाहागीरदार कासीमभाई गिलानी रोहिल्ला यांचेकडे ५०० एकर जमीन होती. आणि यातून निघणारे धान्य एकत्रित साठवण करून ठेवण्यासाठी तो चिंचखेड जवळील डिगाई टेकडीवर सात पेव तयार केलेले होते. ज्यात ज्वारी भरुन ठेवले होते. पणी नायकन्नी कासिमभाईला विनंती केली की, तो पेवातील ज्वारी गोर गरिबांना या दुष्काळात वाटून द्यावे. एकतर मोफत वाटावे. नाहीतर पनी नायकन कडून त्यांचे दाम घेऊन विकत द्यावे. रोहिला काशिम गिलानी जुमानत नव्हता. तो निजाम सरकारची विशेष मेहरबानी आपल्यावर असल्याची तोरा मिरवत होता. पणी नायकन चिंचखेड कासीम गिलानीला भेटण्यासाठी गेली. सोबत महिला होत्या. गिलानीला ज्वारीचे धान्य गोर गरीबांना या दुष्काळाच्या वेळी वाटप करण्याची विनंती केल्या. पण तो काही ऐकाला तयार नव्हता. पणी नायकनला तो म्हणाला की, तुझे जो करना है, कर ले, लेकिन मैं मेरे धान्य का एक तनखा भी किसीको नही दूंगा. अशा प्रकारची अरेरावी भाषा वापरून पणी नायकनला तो तिथून जाण्यास मजबूर केला. आणि पणी नायकनने त्याला सबक शिकवण्याचे ठरवले. कासीम गिलानीचे मालकीची ज्वारीचे पेव लुटायचं ठरवले. त्यासाठी योजना आखली. त्या पेवातील ज्वारी काढायचे असल्यास पेवाचे तोंड सात दिवस अगोदर उघडावे लागत असे. नाहीतर पेवातील वाफेमुळे माणसे मरतात. त्यासाठी पणी नायकनने गनिमी काव्याचा वापर केला. डिगाई टेकडीवरील देवीची पूजाअर्चा करण्यासाठी त्यांच्या ओळखीची तेथील बंजारा लोकांना बकरे कापण्यासाठी जात आहोत असे भासवत पेवचे तोंड उघडावे अशी सूचना देण्यात आली होती. कासीम गिलाणीला त्यांची भनक लागू नये असे ठरले. त्यांना भासत होता. कि, बंजारे या देवीची पूजाअर्जा करून त्या ठिकाणी आपले आनंद लुटत आहे. प्रत्येक तांड्यातील लोकांना धान्य नेण्यासाठी गुप्तपणे कळवायचे होते. त्यासाठी पणी नायकनने त्यांच्या गावातील गंगाराम डुबरकरीला सकाळी ४:०० वाजता उठून प्रत्येक गावात जाऊन आपल्या डुबकी वाजवत गाणे म्हणत लोकांना उठवायचा आणि पणी नायकनचे संदेश द्याचे अशी योजना होती. सगळ्या लोकांना मंगळवारी डिगाई टेकडीजवळ धान्य नेण्यासाठी गुप्तपणे सूचना गंगाराम मार्फत देण्यात आली होती. आणि ठरल्याप्रमाणे पणी नायकनने आपल्या सोबत बंदूकधारी साथीदार लोकांची फौज तयार केली. त्यात काही महिलेचाही समावेश होता. कासीम गिलाणीला धमकी दिली होती की, वह अगर रोकने की कोशिश भी करेगा, तो उसकी जान बक्षी नही जायेंगी. पणी नायकन सोबत साठ बैलगाडी होती. या बैलगाडी समोर पणी नायकन घोड्यावर बसून होती. कमरेला बंदूक आणि गळयात काडतुसाचा पट्टा होता. त्यांच्यासोबत अनेक पुरुष आणि स्त्रिया होत्या. हे पाहून तिला आडवायची हिंमत झाली नाही. कासीम गिलाणी तिच्या विरोधात काही करू शकला नाही. कारण त्याला माहीत होते की, पणी नायकन सोबत या परिसरातील बंजारा समुदाया आहे. आणि त्यांना धान्य वाटप करीत आहे. जर आपण तिला विरोध केला तर आपलं काही वाचणार नाही. स्वताचे प्राण सुद्धा जाऊ शकते. म्हणून तो मुकाट्याने आपला

घरीच थांबला. ती लोकाना सगळे धान्य वाटेपर्यंत तेथे थांबून होती. अशा प्रकारे पणी नायकन लोकांना मदत करीत होती. निजाम सरकार जे शक्य होत नव्हते ते पणी नायकन करीत होती. या वीरांगना पणी नायकनचे निधन पापलवाडी या ठिकाणी २७ मे १९७० ला झाले होते. माहूर परीसरात हैदराबाद मुक्तिसंग्रामात पणी नायकनचे योगदान महत्त्वाचे आहे. पणी नायकनी रझाकारांच्या विरुद्ध लढल्या होत्या बंजारा समाजातील महिलांना सोबत घेऊन रझाकारांना जेरीस आणले होते. त्या काळातील बंजारा समाजातील श्रीमंत, जागीरदार, मालगुजार, सरदार, नायक हे सगळे पणी नायकन सोबत होते. या परिसराला लागून असलेल्या विदर्भ स्वतंत्र झाला होता. इंग्रजांपासून मुक्त झाल्यानंतर त्या ठिकाणी. नवीन योजनां चालू झाल्या होत्या. विदर्भातील विवाह करून आणलेल्या सुना मराठवाडय़ातील सासू बाईला सांगत होत्या की तुम्ही मोगलाई च्या अविकसित लोक आहेत. अशा अनेक कारणे मराठवाड्यातील महिलांना मराठवाडा मुक्ती संग्रामात सहभागी होण्यासाठी भाग पाडले होते.

**होनाजी नाईक**

नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यातील रायपूर तांड्यातील हा निजाम काळात जमिनदार होता. यांच्याकडे ७२० एकर जमीन होती. त्या काळात त्यांच्या तिजोरी एक लाख रुपयाचा. खजिना होता. खजिन्यावर एक लाख रुपयांचा प्रतिक म्हणून एक दिवा लावत असे. ते सतत प्रचलित राहील याची काळजी घेतली होती. म्हणजे तिजोरीत रक्कम एक लाख पेक्षा कमी होऊ नये अशी अपेक्षा होती. होनाजी नाईक निझामाच्या भेटीला हैदराबाद येथे जात असे. तो त्या काळात प्रवास करण्यासाठी डमनी (छकडा) म्हणजे लहान बैलगाडी यावर अर्धगोलाकार बांबूच्या कामट्या पासून बनवलेले छत्र आणि त्यावर ताडपत्रीचे लेपन केले जात होते. आणि अंथरुणावर मखमली कापड असत. डमनी मुळे पाऊस आणि उन्हापासून संरक्षण मिळत असे.. या डमनीला शंकरपटाची बैलजोडी जुंपली जात असे. निजामाचे सनदी अधिकारी प्रवास करण्यासाठी होनाजी नाईकांचे डमनीला घेऊन जात असे. पण काहीनी वेठबिगारांचा वापर करून अतिरिक्तपणा केल्यामुळे संघर्ष करावा लागला होता. होनाजी नाईक या डमनीने विदर्भात जात असे. ब्रिटिश भारत स्वतंत्र झाले होते. विदर्भातील स्वतंत्र चळवळीतील नेत्यांसोबत संपर्क येऊ लागले होते. तेव्हापासून होनाजी नाईक निजामाच्या विरोधात हैदराबाद स्वातंत्र्यसंग्रामात भाग घेण्यास सुरवात केली. त्यातला त्यात निझामाचे रजाकार संघटनेने लोकावर अन्याय अत्याचार करू लागले. त्यामुळे लोकांत निजामाच्या विरोधात क्रोधाची भावना तयार झाली. रझाकार गावागावात जाऊन लोकावर अत्याचार अन्याय करू लागले. त्यामुळे या रजाकारांना धडा शिकण्यासाठी गावागावातून नाईकांनी आपल्या हातात बंदुका घेऊन हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामात उतरले. रझाकारांच्या जोरावर निजामाचे सनदी अधिकारी अरेरावी करू लागले. मन मानेल तसे वागू लागले. अवाजवी लेवी कर लावू लागले. तसेच मनात येईल तेव्हा नाईकाला न विचारताच त्यांच्या डमनी छकडा घेऊन जात असे. वेठबिगारी साठी अनेक माणसाची मागणी करू लागले. यामुळे लोक निजामाच्या विरोधात स्वातंत्र्यसंग्रामात नाईकांना साथ दिली होती. हैदराबाद स्वतंत्र सांगामात ग्रामीण भागात अशाप्रकारचे आंदोलन पेटले गेले.

**गोबा किशन नाईक**

गोबा किसन नाईक यांना जयहिंद गोबा म्हणून ओळखले जातात. किनवट तालुक्यातील रायपूर तांड्यातील हा क्रांतिकारी नाईक होता. त्यांच्याकडे घोडा होता. तो भारताच्या स्वतंत्रता संगमाच्या राष्ट्रीय चळवळीत सक्रिय भाग घेतला होता. विदर्भातील नेत्यांचे भाषण ऐकण्यासाठी तो जात असे. हैदराबाद स्वतंत्र संग्रामात निजामाच्या विरोधात आंदोलन केले होते.. रझाकारांच्या विरोधात सतत संघर्ष करीत होते. ज्या ज्या ठिकाणी रझाकारांनी अन्याय अत्याचार करीत होते. त्या त्या ठिकाणी तो जात होता. रझाकार लेवीसाठी लोकांवर अन्याय करीत असे. त्या ठिकाणी गोवा नाईक जात असे. आणि रझाकारांना पकडून मार दिला जात असे. एका ठिकाणी त्यांनी अनेक रझाकारांना एका खोल विहिरीत

फेकून दिले होते. त्यामुळे त्यांची एवढी दहशत या परिसरात पसरली होती की,रझाकार त्यांचे नाव ऐकून पळून जात असे.  तो येत आहे असे कळल्यावर रझाकार गावातून पळून जात होते. त्यांनी अनेक रझाकारांना मारले होते. आणि हैदराबाद स्वतंत्र संग्रामात निजामाच्या विरोधात आंदोलन केले होते.

**झीपीबाई कारभारीन**

किनवट तालुक्यातील रायपुर तांड्यातील फत्तु उमला जाधव कारभारी यांची पत्नी होती. त्यांच्याकडे गावातील कारभारीपणाचा अधिकार होता. त्यांना आजूबाजूच्या गावातील नसाब हसाब म्हणजे न्याय निवाडा करण्यासाठी त्या त्या गावातील नाईक बोलवत असे.  तो आपल्या पत्नीला कारभारीनला सगळी माहिती देत असे.  कोणावरही अन्याय अत्याचार झाल्यास ते कारभारीन झिपिबाईकडे न्याय मिळवून देण्यासाठी जात असे. प्रसंगी हातात हत्यार घेऊन न्याय मिळवून देत असे. त्यांच्या नावाने नाईक मंडळीसुद्धा भित असे. कोणत्याही गावात कुणावरही अन्याय होणार नाही, याची दखल घेतली जात असे. निजामाचे खाजगी सैनिक रझाकार सामान्य माणसाला अन्याय करीत होते. रझाकार लेवीसाठी महिलाना त्रास देत होते. आणि महीला सोबत हुज्जत घालून त्यांना छेडछाड करीत होते. जेव्हा ही सगळया तक्रारी झिपी कारभारीन कडे जात असे. तेव्हा तिने आपल्या हातातील कोयत्याने रझाकारांवर वार करीत असे. यामुळे रझाकारांच्या मनात दहशत निर्माण झाली होती. एकदा तिच्या घरी रझाकार लेवीसाठी आले होते आणि रझाकार हुज्जत घालून घरातील सामान घेऊन जात होते. तेव्हा झीपीबाई कारभारीन्नने हातात विळा कोयता घेऊन रझाकारांना मारले होते. कोणाच्या हातावर, तर कुणाच्या पायावर मारा करू लागली. त्यामुळें रझाकार तेथून पळ काढला. काही दिवसानंतर रझाकारांनी झीपीबाई कारभारीन्नच्या शेतात जाऊन आपले घोडे चरण्यासाठी सोडून दिले होते. जेव्हा ही माहिती झीपीबाई कारभारीन्नला कळाले, तेव्हा ती आपल्या हत्यार विळा कोयता घेऊन त्या रझाकांराच्या घोड्यांची शेपटी कापून टाकली होती. त्यामुळे घोडे सैरावैरा पळू लागले. रजाकारांना पकडून पकडून ती आपल्या साथीदारसह रझाकारांवर हल्ला केला. या हल्ल्यामुळे रझाकाराच्या मनात दहशत निर्माण झाली होती.  निजाम दरबारात तिच्या बद्दल एक वेगळी प्रतिमा निर्माण झाली होती.  निजाम सरकारने तिच्या कार्याची दखल घेतली होती. यामुळेच तिच्या शेतीवरील मालकी हक्क काढून घेतले होते. त्यासाठी ती निजाम सरकारच्या विरोधात हैदराबाद स्वातंत्र्यसंग्रामात भाग घेतली होती. या धामधुमीत पतीचे निधन झाले होते. ती आपल्या मुलांना घेऊन कोर्टात जात होती. आणि हैदराबाद राज्य स्वतंत्र भारतात विलीन झाल्या नंतर तिच्या बाजुला निकाल लागला होता. अशा प्रकारे ग्रामीण भागातील सामान्य माणूस स्वातंत्र्यसंग्रामात भाग घेतला होता. तत्कालीन आदिलाबाद जिल्ह्यातील किनवट माहूर तालुक्यातील बंजारा समाजातील पुरुष आणि महिला हैदराबाद स्वातंत्र्यसंग्रामात भाग घेतला होता.

**सारांश**

बंजारा समाजाच्या गोर स्त्रिया आणि पुरुष हैदराबाद स्वातंत्र्यसंग्रामात भाग घेतला होता.  हैदराबाद स्वातंत्र्यसंग्रामात बंजारा समाजातील नाईक आणि कारभारीन रझाकारांच्या विरोधात आंदोलन केले होते. ग्रामीण भागातील अनेक सामान्य माणसाला अन्याय अत्याचार विरोधात लढावे लागले होते.  अशा हजारो क्रांतिकारी पुरुष आणि स्त्रिया बंजारा समाजात होऊन गेल्या.

**शामा कोलाम : "खलक खुदा का, मुलुक निजाम का, और अंमल अंग्रेज सरकार का"** – श्यामा सोनबा वाठोडकर यांचा जन्म २६ नोव्हेंबर १८९९ रोजी आदिवासी कोलाम जमातीत वडील सोनबा आणि आई लक्ष्मीबाई यांच्या पोटी कोंडा तालुका बाभूळगाव जिल्ह्यात झाला. शामादादांचा पहिला विवाह भिवराबाईशी झाला. शामा दादा आणि भिवराबाई या जोडप्याला दशरथ नावाचा मुलगा झाला.  दशरथचा मुलगा शामा दादाचा नातू मोरेश्वर अजूनही माहूरला राहतो. शामा दादांची दुसरी पत्नी शारजी पारधी समाजातील होती. जेव्हा शामा दादा १२ वर्षांचे होते. तेव्हा वडील सोनबा वारले होते.  घराची जबाबदारी शामा दादावर होती. त्यामुळेच शामा रोजगारासाठी माहूरला आले होते. भाऊसाहेब देशमुख हे

माहूरचे वतनदार होते. गावात येणाऱ्या नव्या बेरोजगार कुटुंबांना तो रोजगार देत असे. शामा दादांना घरातील कामासाठी ठेवले होते. भाऊसाहेब देशमुख यांना शिकारीची खूप आवड होती. जेव्हा तो शिकारीला जायचा तेव्हा शामा दादाला सोबत घेऊन जात असे..एकदा शामा दादा, राजा, चंदन आणि मोहम्मद हुसेन हे शिकारीसाठी गेले होते. हे चौघेही धनोडा गावाजवळील नदीकाठच्या पाठीमागील डोंगरावर शिकार करण्यासाठी बसले. त्या दिवशी एकही प्राणी आला नाही. चौघांनाही भूक लागली होती. त्यामुळे जवळच असलेल्या धनोडा गावात सावकार प्रभू रंगारी यांच्या घरी गेले. प्रभू रंगारी हे कापूस, ज्वारी, बाजरी इत्यादी व्यवसाय करणारे मोठे व्यापारी होते. धानोडा गावात त्यांचा मोठा वाडा होता. मोहम्मद हुसेनने सावकरचा मुख्य दरवाजा अनेकदा ठोठावला पण दरवाजा उघडला नाही त्यामुळे हुसेन संतापला. बऱ्याच वेळानंतर प्रभू रंगारी यांनी दरवाजा उघडला आणि तो उघडताच मोहम्मद हुसेन याने त्यांच्यावर गोळी झाडली. धनोडा गाव विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यातील आर्णी पोलीस ठाण्यात येत होते. सावकर कुटुंबीयांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यावेळी माहूर येथून चार शिकारी आल्याचे गन्ना नावाच्या व्यक्तीने पोलीस बंदोबस्तात सांगितले. आणि त्याच वक्तव्यावरून आर्णीचे डीएसपी पोलिसांसह भाऊसाहेबांच्या घरी आले. कारण हे चौघेही भाऊसाहेबांचे नोकर होते. तेथे तिघांचीही चौकशी करण्यात आली. या तिघांवर नजर ठेवण्यासाठी मिर्झा बेग नावाचा पोलीस अधिकारी ठेवण्यात आला होता. मिर्झा बेग हा अतिशय वाईट पोलीस होता. तो या तिघांनाही शारीरिक व मानसिक त्रास देऊ लागला. राजाने मिर्झा बेगला गोळ्या घालून ठार केले होते. आर्णी पोलिस ठाण्यातून या तिघांना अटक करण्याचे वॉरंट जारी करण्यात आले होते. त्यामुळे तिघांनीही जंगलाचा मार्ग स्वीकारला होता. त्यावेळी भारतात इंग्रजांविरुद्ध क्रांतिकारी चळवळ चालू होती. चिचदराला घेराव : शामा दादा, राजा, चंदन सिंग, रज्जाक, शिवराम, वग्या यांच्या कारवायांवर पोलिसांचे पूर्ण लक्ष होते. माहूरमध्ये पोलिसांची संख्या सातत्याने वाढत होती. मांडवा गावाजवळील चिचदरा नावाच्या नदीवर शामा दादा आणि त्याचे साथीदार ठाण मांडून असल्याची माहिती पोलीस अधिकाऱ्याला मिळाली. पोलिसांनी चिचदराला घेराव घातला होता. श्यामा, राजा आणि त्यांच्या साथीदारांवर गोळ्या झाडू लागल्या. शामा दादा जंगलात फरार झाला होता. किनवट तालुक्यातील कनकवाडी हे एक लहान वस्तीचे गाव होते. गावात कोमिटी समाजाचे सावकार राहत होते. तो गरिबांची सोने, चांदी, शेतजमीन गहाण ठेवून त्यांना कर्ज देत असे. त्या कर्जावर तो इतकं व्याज आकारायचा की त्या गरीब कर्जदाराचा गहाण ठेवलेला माल तो स्वतःचा म्हणून घेत असे. लोकांच्या तक्रारी होत्या. शामा दादांकडे तक्रार आली होती. शामा दादांनी एक बेत आखला. सावकरांच्या सेवकाने सावकाराची सर्व माहिती कोडीबाकडून घेतली होती. शामा दादा, शारजी आणि इतर चार मित्रांनी साधूचा पोशाख बनवला. भगव्या ध्वजात गुंडाळलेली बंदूक त्याने सोबत घेतली होती. पिशवी दगडांनी भरलेली होती. दिंडी काढत 'जय रेणुका माता', 'जय दत्तात्रेय प्रभू' असा जयघोष करत गावात दिंडी घेऊन एका मंदिरात थांबले. सावकारांच्या घरासमोर हे हनुमान मंदिर होते. संधी पाहून रात्रीच्या सुमारास शामा दादा सावकारच्या घरात घुसले आणि हवेत गोळी झाडली. त्या गोळीचा आवाज ऐकून सावकाराचे सर्व सेवक पळून गेले. त्या सावकाराच्या पेटीत ठेवलेले सोने व मौल्यवान वस्तू घेऊन शामा दादा आपल्या साथीदारासह माहूरच्या डोंगरावर पोहोचले. गरिबांच्या मुलीचे लग्न करणे, गरिबांना त्यांच्या छोट्या व्यवसायासाठी पैसे देणे, गरिबांना दवाखान्यासाठी पैसे देणे, अशा प्रकारे शामादादा गरीबांना नेहमीच मदत केली.

**रझाकारांशी संघर्ष**

स्त्रियांवर अत्याचार करणे, हिंदू जमीनदारांकडून जमिनी घेणे आणि ते मुस्लिम लोकांमध्ये वाटणे, हिंदू गावे जाळणे आणि हिंदूंना तेथून हाकलून देणे. माहूर तालुक्यातील हिंगणी गावात रझाकारांच्या टोळक्याने अत्याचार केले होते. हिंगणी हे बापूराव जमीनदार यांचे गाव होते. बाबुरावांची पाचशे एकर जमीन रझाकांनी बळकावली होती. बाबुराव हे जमीनदाराच्या वाड्यात आपला अड्डा बनून राहू लागले होते. त्यांनी ही घटना शामा दादांना सांगितली होती. शामा दादांनी रझाकारांना धडा शिकवण्याची योजना आखली होती. शामा दादांनी पंचकोशीतील सर्व जमीनदारांची

बैठक बोलावली होती. नारायणराव, सतवारराव, दलपतराव, अवधूतराव, हे सर्वच क्षेत्राचे मक्तेदार होते. रझाकारांवर सर्वजण नाराज होते. शामा दादांनी सर्वांना शस्त्र खरेदी करण्यास सांगितले होते. हिंदू तरुणांना शस्त्रे देऊन रझाकारांविरुद्ध लढण्यासाठी तयार करण्यात आले. मादापूर गावात रझाकार आणि शामा दादा यांच्यात संघर्ष झाला. महागाव आणि फुलसांगवी गावात जाऊन रझाकारांना हुसकावून लावले. किनवट तालुक्यातील रायपूर तांडा जंगलात शामा दादाचे ठिकाण होते. ते पाच टेकडीशी जोडलेले आहे. शामा दादांनी जंगलात झोपडी बांधली आणि तिथे राहू लागले. या जागेची माहिती सिंदखेड पोलीस ठाण्यात आली होती. या ठिकाणी पोलिसांनी हल्ला केला होता. शामा दादाकडे अरबी बनावटीची वाघंबरी नावाची बंदूक होती. बंदुकीचा आवाज खूप मोठा होता. शामा दादांनी बंदुकीतून गोळ्या झाडायला सुरुवात केली. गोळीबारात अनेक पोलिसांना गोळ्या लागल्या. शामा दादाने झोपडी जाळली आणि तेथून अंधारात दुसऱ्या जंगलात गेले. पोलिसांच्या गोळ्यांनी श्यामा दादांची झोपडी जळून खाक झाल्याचे पोलिसांच्या लक्षात आले आणि त्या आगीत श्यामा दादा आणि त्यांचे साथीदार जळून खाक झाले. त्या झोपडीतील जळालेल्या जनावरांच्या हाडांचा पंचनामा करून पोलीस काही दिवस शांततेत राहू लागले, शामा दादा आणि शारजी माहूरच्या जंगलातून किनवटच्या जंगलाकडे जात होते. मेंडकी-मुंगशी गावातून किनवट जंगलात जात असताना पोलिसांना ही खबर मिळाली. त्या मार्गावर गस्त घालण्यास सुरुवात केली. शामा दादाला अटक करण्यासाठी पन्नास पोलिस रस्त्यावर थांबले होते. तेव्हा शामा दादा त्या वाटेने जात होते. पोलिसांनी त्यांच्यावर गोळीबार सुरू केला. प्रत्युत्तर म्हणून गोळीबार सुरू झाला. पोलिसांची संख्या जास्त होती. जोरदार गोळ्या झाडल्या जात होत्या. शामा दादा कोलाम जमिनीवर पडून गोळ्या झाडत राहिले. पोलीस मागे हटत नव्हते. शामा दादाला सहा गोळ्या लागल्या. शामा दादा माहूरचे महंत महाराजांना भेटायला गेले होते. नाना पाटील पत्री सरकारचे पत्र शामा दादांना आले होते. शामा दादांना नाना पाटील यांनी पत्री सरकारमध्ये सामील होण्याचे निमंत्रण दिले होते. गुन्हेगार १४ वर्षे फरार राहिल्यास त्याची शिक्षा माफ केली जाते. सरकार त्याला पकडू शकत नाही. शामा दादाला फरार होऊन १३ वर्षे ५ महिने झाले होते. शामा दादांना चिंतन भारतीने पत्री सरकारला लिहिलेले पत्र मिळाले आणि १४ वर्षे पूर्ण झाल्यानंतर ते पत्री सरकारमध्ये सामील होतील असा संदेश दिला. गोदाजी मुखरेचे दिवाणजी पंजाबराव यांनी काही गोळ्या व राऊंड आणून माहूरला ठेवले होते. शामा दादाने शारजीला साकूरच्या सावकार सखारामच्या घरी ठेवले होते. त्या दिवशी कासारपेठ येथील रामजी नाईक यांच्या घरी दारू आणि बोकडाची मेजवानी देण्यास सांगितले. रामजी नाईकांनी अतिशय हुशारीने दारूचा ग्लास तोंडाला लावून खाली पाडला. दारू पिऊन शामा कोलम बेशुद्ध झाला होता. रामजी नाईक यांनी त्याला दोरीने बेडवर बांधले होते. पोलिसांना कळवण्यात आले. त्याला पकडण्यासाठी सरकारने ₹ १०,००० चे बक्षीस दिले होते. रामजी नाईक, आनंदा, रामचंद्र आणि गावकरी शामा दादांना सोडायला तयार नव्हते. सिंदखेडचे एसएचओ वंजारी साहेब आणि माहूरचे एसएचओ पठाण साहेब यांनी कासारपेठला जाऊन शामा दादाला हातकडी लावून बैलगाडीत लखमापूरला आणले. किनवटला बैलगाडीने पलाईगुडा, वानोळा, कनकवाडी मार्गे नेण्यात आले. शामा दादावर किनवटच्या न्यायालयात खटला चालला. तेथून त्याला आदिलाबाद, हैदराबाद, निजामाबाद, औरंगाबाद, यवतमाळ येथील तुरुंगात टाकण्यात आले. आदिलाबाद न्यायालयाने श्यामा दादाला पोलिसांची हत्या आणि सावकार लुटल्याप्रकरणी शिक्षा सुनावली होती. २० वर्षांच्या कारावासाची शिक्षा झाली. देश स्वतंत्र झाला होता. या कैद्याचा स्वभाव चांगला असून त्याचे वय आधीच ६० वर्षे आहे. त्या कैद्याला गांधी जयंतीच्या दिवशी शिक्षा माफ करून सोडण्यात येते. जाबुवंतराव थोटे यवतमाळ कारागृहात श्यामा दादांना भेटायला येत असत. त्यांनी भारत सरकारला याची शिफारस केली शामादादांच्या सुटकेनंतर जाबुवंतराव थोटे यांची यवतमाळमध्ये भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. शामा दादांनी अखेरचे आयुष्य यवतमाळच्या मासोली गावात घालवले. शामा दादा यांचे १ ऑगस्ट १९९९ रोजी दत्त निरंजन माहूर तालुका कळंब जिल्हा यवतमाळ येथे निधन झाले.

**संदर्भग्रंथ सूची**


१. कोलाम: भाऊ मांडवकर, सेवा प्रकाशन, अमरावती, १९५६

२. शिकारनामा: राजे मधुकरराव देशमुख, मनाक्षरे प्रकाशन, नांदेड़

३. शिकारीराजा: राजे मधुकरराव देशमुख, निर्मल प्रकाशन, नांदेड़

४. बिलामत  दिनकर दाभाड़े, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई १९९४

५. नांदेड जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन, अर्थ व संख्यीक संचानालय, मंबई

६. डॉ. दत्ता जाधव, माहूरगडची रायबागण, एवन प्रकाशन परभणी

७. ऑल इंडीया बंजारा सेवा संघ, महाराष्ट्र राज्य मुंबई

८. बळीराम पाटील, आलेख समाज प्रगतीचा, बळीराम पाटील स्मारक समीती किनवट

९. वसंतराव नाईक, समृध्दीच्या वाटा (भाषणे)

१०. नांदेड जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन, अर्थ व संख्यीक संचानालय, मंबई

११. डॉ. दत्ता जाधव, माहूरगडची रायबागण, एवन प्रकाशन परभणी

१२. बळीराम पाटील, आलेख समाज प्रगतीचा, बळीराम पाटील स्मारक समीती किनवट